# संपादकीय

## स्वातंत्र्याची पंचाहत्तरी

देशाचा पंचाहत्तरावा स्वातंत्र्यदिन आज साजरा होत आहे. मात्र यंदाचा आणि यापूर्वीचा असे दोन स्वातंत्र्यदिन भयाच्या सावटातच गेले आहेत. भय आहे कोविडचे आणि त्यापासून मुक्ति कधी मिळणार, या आशेवर सारे भारतीय आला दिवस रेटत आहेत. कोविडचे सावट काही केल्या हटत नाहि. अगोदर मोदी सरकारला कोविड किती अनर्थ करणार आहे, याचा अंदाजच नव्हता. नंतर लस आली आणि असे वाटले की आता कोविड संपला. पण लसीकरणाचा बोजवारा उडाला आणि तरीही कोविडचे सावट तसेच राहिले. कोविडची पहिली आणि दुसरी लाट आली आणि आता तिसर्या लाटेची शक्यता तज्ज्ञ वर्तवत आहेत. आता तर भारतीयांची मानसिकता कोविड विषाणुबरोबर रहाण्याची तयार झाली आहे, असे वाटत आहे. कारण आता कोविडला कुणीही गांभिर्याने घेत नाहि. वास्तविक या गांभिर्याने न घेण्यानेच कोविडच्या दोन लाटांत अपरिमित हानी झाली. स्वातंत्र्याची पंचाहत्तरी साजरी करत असताना कोविडचे गंभीर सावट आहे आणि त्यातच आपण सारे स्वातंत्र्यदिन साजरा करत आहोत. वयाची पंचाहत्तरी म्हणजे खरेतर परिपक्वतेची सीमा असते. माणसाच्या आयुष्यात खरेतर पंचाहत्तरी म्हणजे पैलतीराचे वेध लागलेले असतात. पण राष्ट्र हे अभंग आणि अखंड चालणारे असते. त्यामुळे राष्ट्राच्या बाबतीत पंचाहत्तरी म्हणजे परिपक्वतेची अवस्था गाठण्याचे वय आहे. पण भारताचा विचार केला तर आपण खरोखर परिपक्व झालो आहोत का, हा प्रश्न आहे. जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून आपण आपलाच गौरव करून घेतो. पण आपले राष्ट्र म्हणून आपण हे विशेषण लावण्यास पात्र आहोत का, हा खरा प्रश्न आहे. केंद्रात सत्ता कुणाचीही असो, सरकारने नेहमीच दडपशाहीने वर्तणूक ठेवली आहे. इंदिरा गांधी यांनी आणिबाणी लावून देशाच्या इतिहासावर काळा डाग लावला होता. भारताच्या स्वातंत्र्याच्या पंचाहत्तर वर्षांच्या कालखंडात तो सर्वात भयानक कालखंड होता. सार्या लोकशाही मूल्यांचा संकोच त्या काळात यथेच्छपणे करण्यात आला. पण त्या काळात भारतीय जनतेने जो अभूतपूर्व लढा दिला, त्याला इतिहासात तोड नाहि. पण त्यानंतर परिस्थिती काहीही सुधारली नाहि. फक्त काँग्रेसने त्यानंतर असा विचारही स्वप्नातही केला नाहि, इतकेच. मोदी सरकार दोन वेळा एकहाती विशाल बहुमत घेऊन आले आहे. मोदी यांची जादू अजूनही भारतीय जनमानसावर आहे, यात काही शंका नाहि. पण या सरकारने विरोधकांना संपवण्यासाठी सीबीआय, ईडीसारख्या तपास यंत्रणांचा वापर मुक्तपणे केला असल्याचा आरोप विरोधक करत आहेत. अर्थात विरोधकाना खास करून काँग्रेसला असे आरोप करण्याचा नैतिक अधिकार उरला आहे का, हाच खरा सवाल आहे. कारण काँग्रेसनेही आपल्या सत्ताकाळात सीबीआयचा वापर विरोधी नेत्यांना दहशत घालण्यासाठी केलाच होता. खुद्द पंतप्रधान मोदी यांनाही काँग्रेसने सीबीआयच्या माध्यमातून त्रास दिला होता. पण याचा अर्थ मोदी सरकारनेही तोच कित्ता गिरवावा, असा होत नाहि. पण हे चालू आहे. सीबीआयला पिंजर्यातील पोपट म्हटले गेले. सारेच पक्ष आपापल्या सत्ताकाळात असेच करणार आहेत. पंचाहत्तर वर्षांत तांत्रिक प्रगति भरपूर झाली. त्याची जंत्री देण्याची गरज नाहि. पण मूल्यव्यवस्थेत काहीच प्रगति झाली नाहि. उलट पंचाहत्तर वर्षांत भ्रष्टाचार प्रचंड बोकाळला. आता उजळ माथ्याने भ्रष्टाचार केला जातो आणि पूर्वी त्याची खंत तरी असायची. आता तीही नाहि. लोक सरळ भ्रष्टाचार करतात आणि तो दाबून टाकण्यासाठी पुन्हा पैसा वापरतात. त्याबद्दल जनतेलाही काही वाटत नाहि. लोकांनीही भ्रष्टाचार हा स्विकारला आहे. कुणी भ्रष्टाचाराबद्दल चिड येऊन बोलताना दिसत नाहि. मूल्य वगैरेंबाबत बोलणारेही आता कमी झाले आहेत. करचुकवेगिरी आता सारे डिजिटल व्यवहार सुरू झाल्याने कमी झाली आहे, हे मान्यच करावे लागेल. ही मोदी सरकारची देणगी आहे. डिजिटल व्यवहारांमुळे बनावट व्यवहार, रोखीने व्यवहारांद्वारे लाचखोरी याला बर्यापैकी आळा बसला आहे. केंद्रिय मंत्र्यांच्या भ्रष्टाचाराचे एकही प्रकरण सात वर्षात बाहेर आले नाहि. हे मोदींचेच श्रेय आहे. न खाऊंगा न खाने दूँगा ही घोषणा त्यांनी प्रत्यक्षात आणली आहे. काँग्रेसच्या काळात प्रत्येक मंत्र्यांचे काहीतरी प्रकरण असायचे. टुजी, कोळसा वगैरे कितीतरी घोटाळ्यांची नावे घेता येतील. ही पंचाहत्तर वर्षांतील काँग्रेसची कामगिरी होती. मोदी आल्यापासून निश्चितच हे थांबले आहे. काँग्रेस म्हणूनच अस्वस्थ असावी. स्वातंत्र्याच्या इतिहासात भारताने कोविडची दोन वर्षे सोडली तर थक्क करणारी प्रगति केली आहे. यात सार्याच पक्षांचे श्रेय आहे. मेट्रो, मोनो रेल्वे, विद्युत बस वगैरै अनेक पर्याय उपलब्ध झाले आहेत. अमेरिका आर्थिक मंदीने कोसळली तेव्हाही भारतीय अर्थव्यवस्था मजबूत होती. थेट हस्तांतरण योजनेमुळे दलालांचा भ्रष्टाचार बंद झाला असून लाभार्थ्यांच्या बँक खात्यात पैसा जमा होत आहे. पंचाहत्तर वर्षांच्या प्रगतिचा हा आलेख नाहि. तर भारताने किती साध्य केले आहे आणि किती साध्य करायचे आहे, याचा विचार आहे. सामाजिक समतेबाबत अजूनही तितकीशी प्रगति केली आहे, असे वाटत नाहि. लोकांची मानसिकता बदललेली नाहि. त्यासाठी राजकारण्यांनी स्वतःच्या आदर्श वर्तनाने लोकांसमोर उदाहरण घालून दिले नाहि. आरक्षण हे योग्य आहे, पण त्यात गुणवत्तेचा गळा दाबला जात नाहि, हे पहाणे राजकारण्यांचे काम होते. पण मागेल त्याला आरक्षण असे धोरण ठेवून राजकीय नेत्यांनी गुणवत्तेचे मार्ग बंद करण्याचा सपाटा लावला आहे. अले अनेक प्रश्न आहेत की जे सोडवायला हवे आहेत. स्वातंत्र्यांची पंचाहत्तरी साजरी करताना ते समोर आले आहेत.

# रेल्वे स्थानकांतील पाससाठीच्या रांगा ओसरल्या



**बदलापूर, दि. १४, (प्रतिनिधी) :** ठाणे, कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर, अंबरनाथ आणि बदलापूर शहरांतील नोकरदार वर्गाने रेल्वेचा पास घेण्यासाठी गेले दोन दिवस स्थानकांमध्ये मोठी गर्दी केली होती. परंतु लशीची दुसरी मात्रा घेतलेल्यांची संख्या कमी असल्यामुळे तसेच ऑनलाइनद्वारे पास काढण्याची सुविधा उपलब्ध झाल्याने स्थानकातील गर्दी शुक्रवारी ओसरल्याचे चित्र दिसून आले. कक्षातील कर्मचारी पडताळणीसाठी येणाऱ्या प्रवाशांची वाट पाहत बसल्याचे चित्र दिसून येत आहे. राज्य शासनाने लोकल प्रवासासाठी करोना प्रतिबंधक लशीच्या दोन मात्रा घेणे बंधनकारक केले आहे. यानुसार लशीची दुसरी मात्रा घेतलेले नागरिक रेल्वे पास मिळविण्यासाठी गेल्या दोन दिवसांपासून गर्दी करीत होते. पहिल्या दिवशी म्हणजेच बुधवारी ठाणे स्थानकात ८७७, कळवा स्थानकात २९१, दिवा स्थानकात १९६ आणि मुंब्रा स्थानकात ७० नागरिकांच्या कागदपत्रांची रेल्वे पाससाठी पडताळणी करण्यात आली, तर गुरुवारी ठाणे स्थानकात ६४६, कळवा स्थानकात १४५, दिवा स्थानकात १३१ आणि मुंब्रा स्थानकात ८९ नागरिकांच्या कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली. कल्याण-डोंबिवली क्षेत्रातील सात रेल्वे स्थानकांत २ हजार ५०६ नागरिकांच्या कागदपत्रांची बुधवारी पडताळणी करण्यात आली होती. तर शुक्रवारी मात्र त्याहून कमी नागरिक कागदपत्रांच्या पडताळणीसाठी आल्याचे दिसून आले. रेल्वे पाससाठी रेल्वेस्थानकांवर मदत केंद्रे उभारली गेली आहेत. बदलापूर स्थानकात तीन दिवसांत १,९१० प्रवाशांनी कागदपत्रांची पडताळणी केली. अंबरनाथ स्थानकात १,७८० प्रवाशांनी पाससाठी धाव घेतली होती. उल्हासनगर, विठ्ठलवाडी आणि शहाड रेल्वे स्थानकांत एकूण मिळून १,६३५ प्रवाशांनी कागदपत्रांची पडताळणी केली आहे. या तिन्ही शहरांमध्ये दुसरी मात्रा घेतलेल्या नागरिकांची संख्या एकूण लसीकरणाच्या २० ते २५ टक्के आहे. त्यामुळे अंबरनाथ आणि उल्हासनगर या शहरांमध्ये दोनच दिवसात पाससाठी होणारी गर्दी ओसरल्याचे चित्र दिसून आले. बदलापूरमध्ये मात्र गर्दी फारशी कमी झालेली नाही.

रोज वाचा दै. 'मुंबई लक्षदीप'

## नागपुरात दोन हत्याकांडांचा थरार; पोलिसांमध्ये उडाली खळबळ

**नागपूर, दि. १४, (प्रतिनिधी) :** यशोधरानगरात कुख्यात गुन्हेगाराचे अपहरण करून त्याचा खून करण्यात आला. त्यानंतर गुन्हेगाराचा मृतदेह नदीत फेकण्यात आला. ही थरारक घटना शनिवारी रात्री १० वाजताच्या सुमारास उघडकीस आली. इब्राहिमखान ऊर्फ छोटे नबीखान (वय २२, रा. बोरियापुरा) असे मृतकाचे नाव आहे.

याप्रकरणी यशोधरानगर पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून सोनू ऊर्फ इमरान अहमद अली (वय २५, रा. यशोधरानगर), मोहम्मद रशीद मोहम्मद रफीक शहा (वय २५, रा. कामठी) आणि शमी टायगर अन्सारी (वय २४, रा. यशोधरानगर) या तीन मारेकऱ्यांना अटक केली. छोटे नबीखान हा कुख्यात गुंड होता. त्याच्याविरुद्ध तडीपार व एमपीडीएअंतर्गत स्थानबद्धतेचीही कारवाई करण्यात आली होती. दोन महिन्यांपूर्वी पोलिसांनी दरोड्याच्या तयारीत असणाऱ्या दरोडेखोरांना अटक केली होती. याप्रकरणात छोटे नबीखान हा फरार होता. तो यशोधरानगर परिसरात मित्राकडे राहायचा. याबाबत त्याच्या कुटुंबीयांनाही माहिती होती. सोनू आधी बोरियापुरामध्ये राहायचा. त्याचा नबीखानसोबत वाद व्हायचा. नबी आपल्याला ठार मारेल, अशी भीती सोनूला होती. त्याने नबीच्या हत्येचा कट आखला. रशीद व अन्सारीला या कटात सहभागी केले. ४ ऑगस्टला रशीदने नबीला यशोधरानगर चौकात बोलाविले. नबी तेथे गेला. त्यानंतर तिघांनी त्याला निजामुद्दीन कॉलनी परिसरात नेले. तेथे चाकू व तलवारीने वार करून नबीची हत्या केली. त्याचा मृतदेह पोत्यात टाकला व कन्हान नदीत फेकला. दरम्यान, तीन दिवसांपूर्वी नबीचे अपहरण करून खून करण्यात आला असून यात एक जण जखमी असल्याची माहिती यशोधरानगर पोलिसांना मिळाली. पोलिसांनी जखमीचा शोध घेतला. अरबाज कुरेशी हा जखमी असल्याचे आढळले. पोलिसांनी शनिवारी त्याची चौकशी केली. 'सोनू व त्याच्या साथीदारांनी नबीचा खून केला व मला ठार मारण्याचा प्रयत्न केला,' असे अरबाजने पोलिसांना सांगितले. त्यानंतर पोलिसांनी सोनू व त्याच्या साथीदारांना ताब्यात घेतले. मृतदेह कन्हान नदीत फेकल्याचे तिघांनी पोलिसांना सांगितले. पोलिसांनी नदीत शोध घेतला असता नबीचा मृतदेह आढळला. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी मृतदेह हॉस्पिटलकडे रवाना केला. पोलिसांनी खून, पुरावा नष्ट करण्यासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून तिघांना अटक केली. यशोधरानगरमधील रहस्यमय हत्याकांडाचा उलगडा होत नाही तोच रविवारी सकाळी १० वाजताच्या सुमारास युवकाने टॉमीने वॉर करून सहकाऱ्याचा खून केला. दाभा परिसरात ही घटना उघडकीस आली.

राजू नंदू नंदेश्वर (वय ३५, मूळ रा. बालाघाट) असे मृतकाचे तर देवांश चंद्रभान वाघोडे (वय २६, मूळ रा. वर्धा) असे मारेकऱ्याचे नाव आहे. दोघेही आशिष दुर्गे याच्या गॅरेजमध्ये काम करतात. बाजूच्याच खोलीत राजू व देवांश राहायचे. शनिवारी रात्री दोघांमध्ये वाद झाला. देवांशने टॉमीने डोक्यावर वार करून राजूचा खून केला. नंतर मृतदेह फरफटत नेऊन खोलीमागील मैदानात फेकला. खोलीत पडलेले रक्त साफ केले व झोपी गेला. रविवारी सकाळी आशिष तेथे आला. त्याने राजूबाबत विचारणा केली. राजू रात्रीपासून बेपत्ता असल्याचे देवांशने आशिषला सांगितले. दरम्यान, एका नागरिकाला मैदानात मृतदेह दिसला. माहिती मिळताच गिट्टीखदान पोलिसांचा ताफा तेथे पोहोचला. आशिषही तेथे गेला. मृतकाची ओळख पटली. राजू व देवांश सोबत एकाच खोलीत राहायचे, असे आशिषने पोलिसांना सांगितले. पोलिसांनी खोलीची पाहणी केली. पोलिसांना रक्ताचे डाग दिसले. देवांशला ताब्यात घेऊन पोलिसांनी कसून चौकशी केली. राजूची हत्या केल्याचे त्याने मान्य केले. पोलिसांनी खून व पुरावा नष्ट करण्याचा गुन्हा दाखल करून देवांशला अटक केली.

## कल्याणमधील वृत्तपत्र संघटनेची पूरग्रस्तांना मदत

**कल्याण, दि. १४, (प्रतिनिधी) :** महाड आणि चिपळूणला पुराचा तडाखा दिला. अनेक घरे, कुटुंबे उद्ध्वस्त झाली. अनेकांचे संसार उघड्यावर आले. अशा पूरग्रस्तांना मदत करण्यासाठी कल्याणमधील वृत्तपत्र संघटनेने पुढाकार घेऊन जीवनावश्यक वस्तू जमा केल्या. या वस्तूंचे पुराचा तडाखा बसलेल्या पोलादपूर तालुक्यातील उमरठ गावाजवळील चांदक वाडीतील आदिवासी बांधवांना वाटप करण्यात आले. कल्याण वृत्तपत्र संघटनेने पूरग्रस्तांना मदत करण्याचा निर्णय एका बैठकीत घेतला. कपडे, धान्य, किराणा, जीवनावश्यक वस्तु, आरोग्यासाठी लागणाऱ्या आवश्यक वस्तू, घर संसारासाठी लागणारी आवश्यक भांडी जमा केली. एका टेम्पोमधून सर्व साहित्य चांदक गावात नेण्यात आले. तेथे प्रत्येक घरात वस्तूंचे वाटप करण्यात आले. कल्याण वृत्तपत्र संघटनेने केलेल्या या मदतीबद्दल गावकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी कल्याण वृत्तपत्र संघटनेचे अध्यक्ष अमित खोत, कार्याध्यक्ष दिनेश इंदुलकर, सुनील थोरात, पंकज बडगुजर, राम पवार, महेश शिंपी, प्रीतम जैतपाल, पेच्ची कोणार यांनी विशेष मेहनत घेतली.

### साश्वत टेक्नोक्राफ्ट लिमिटेड

**सीआयएन –** एल२४२२०एमएच१९७५पीएलसी०१८६८२
**नोंदणीकृत कार्यालय:** कार्यालय क्रमांक १४, पहिला मजला, प्लंबर हाऊस, ५५७, जे.सी.सी. रोड, चिरा बाजार, मुंबई – ४००००२
**ई – मेल आयडी:** sashwat.technocrats@gmail.com
**संपर्क क्रमांक:** २२०१६०२१/२२०१६०३१

**सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, कंपनीची ४५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार, ६ सप्टेंबर, २०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात कार्यालय क्रमांक १४, पहिला मजला, प्लंबर हाऊस, ५५७, जे.एस.एस. रोड, चिरा बाजार, मुंबई – ४००००२ येथे **२८ जून, २०२१** च्या सूचनेत नमूद व्यवसायावर विचार विमर्श करण्याकरिता हाणार आहे.
बैठकीत ज्या व्यवसायाचा व्यवहार केला जाईल तो इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे मतदानाद्वारे व्यवहार केला जाऊ शकतो ज्यासाठी कंपनीने नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेडशी करार केला आहे. वार्षिक सर्वसाधारण सभेच्या उद्देशाने ३० ऑगस्ट, २०२१ ते ५ सप्टेंबर, २०२१ पर्यंत कंपनीचे सदस्य नोंदणी आणि शेअर हस्तांतरण पुस्तके बंद राहतील.
ई–मतदानाचा कालावधी **३ सप्टेंबर, २०२१** रोजी सकाळी ९.०० वाजता सुरू होतो आणि संध्याकाळी ५.०० वाजता संपतो. **५ सप्टेंबर, २०२१ रोजी, ३० ऑगस्ट, २०२१** च्या कट–ऑफ तारखेनुसार कंपनीचे सदस्य वास्तविक स्वरूपात किंवा डिमॅट स्वरूपात शेअर्स धारण करून इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करू शकतात.
कोणतीही व्यक्ती, जी कंपनीचे शेअर्स घेते आणि **३० ऑगस्ट, २०२१** च्या कट ऑफ तारखेनुसार नोटीस पाठवल्यानंतर आणि शेअर्स धारण केल्यानंतर कंपनीचे सदस्य बनते, ती कंपनीच्या रजिस्ट्रार, मेसर्स पूर्वा शेरेजिस्ट्री (इंडिया) शी संपर्क साधू शकते. प्रायव्हेट लिमिटेड. सदस्य संध्याकाळी ५.०० नंतर ठरावांवर ई द्व मतदान करू शकत नाहीत. **५ सप्टेंबर, २०२१ रोजी.** ज्या सदस्यांनी ई–मतदानाद्वारे मतदान केले नाही ते त्यांचे मतदानाचा अधिकार एजीएममध्ये वापरू शकतात. कंपनी एजीएमच्या ठिकाणी बॅलेट पेपर्सची व्यवस्था करेल. ज्या सदस्यांनी एजीएमच्या अगोदर ई–मतदानाद्वारे मतदान केले आहे ते देखील एजीएममध्ये उपस्थित राहू शकतात परंतु त्यांना पुन्हा मत देण्याचा अधिकार नाही. ई–मतदानासाठी सविस्तर प्रक्रिया आणि सूचना एजीएमच्या नोटिसमध्ये समाविष्ट आहेत.
एजीएमची सूचना एनएसडीएलच्या वेबसाइटवर www.evoting.nsdl.com वर देखील उपलब्ध आहे. तपशीलवार सूचना आणि/किंवा ई–मतदानाशी संबंधित कोणत्याही तक्रारींसाठी, भागधारक खालील संपर्कात येऊ शकतात:

| |
|---|
| नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड नाव: अमित विशाल/ पल्लवी म्हात्रे पद: सीनियर मॅनेजर/ मॅनेजर, पत्ता: ट्रेड वर्ल्ड, चौथा आणि पाचवा मजला, कमला मिल्स कंपाउंड, लोअर पारे !, मुंबई – ४०००१३ दूरध्वनी क्रमांक ०२२–२४९९४५४५ ईमेल आयडी: evoting@nsdl.co.in |
| पूर्वा शेरेजिस्ट्री (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड नाव: पूर्वा शाह पद: संचालक, पत्ता: ९, शिवशक्ती इंड, इस्टेट, जेआर बोरीचा मार्ग, लोअर पारे! (पूर्व), मुंबई द्व४०००११ दूरध्वनी क्रमांक ०२२ – २३०१६७६१ ईमेल आयडी: busicomp@gmail.com |
| साश्वत टेक्नोक्रॅट्स लिमिटेड नाव: अक्षर जगदीश पटेल, पद: कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी, पत्ता: कार्यालय क्रमांक १४, पहिला मजला, प्लंबर हाऊस, ५५७, ग.ड.ड. रोड, चिरा बाजार, मुंबई– ४००००२ दूरध्वनी क्रमांक ०२२– २२०१६०२१ ईमेल आयडी: sashwattechnocrats@gmail.com |

**साश्वत टेक्नोक्राफ्ट लिमिटेड करिता**
**सही/–**
**मनिष जखालिया**
**संचालक**
**डीआयएन – ०१८४७१५६**

**दिनांक – १२.०८.२०२१**
**ठिकाण – मुंबई**

## १५ वर्षीय पत्नीसोबत शारीरिक संबंध बलात्कार नाही : अलाहाबाद कोर्ट

**प्रयागराज, दि. १४, (प्रतिनिधी) :** अल्पवयीन मुलीवर बलात्कार प्रकरणातील अलाहाबाद उच्च न्यायालयाची टिप्पणी वादग्रस्त ठरलीय. १५ वर्षांहून वयानं अधिक असलेल्या पत्नीसोबत शारीरिक संबंध प्रस्तापित करणं बलात्काराच्या श्रेणीत येत नाही, असं अलाहाबाद उच्च न्यायालयानं सुनावणी दरम्यान म्हटलंय. भारतीय दंड विधानाच्या कलम ३१५ मध्ये करण्यात आलेल्या सुधारणेत हा नियम असल्याचा हवालाही न्यायाधीशांनी दिलाय. या सुधारणेनुसार, १५ वर्षांहून अधिक वयाच्या पत्नीसोबत शारीरिक संबंध प्रस्तापित करणं बलात्काराच्या श्रेणीत येत नाही. गुरुवारी अलाहाबाद न्यायालयासमोर हे प्रकरण सुनावणीसाठी दाखल झालं होतं. या प्रकरणात हुंड्यासाठी छळ, अल्पवयीन पत्नीसोबत शारीरिक संबंध प्रस्थापित करणं आणि अप्राकृतिक शारीरिक संबंध असे आरोप आरोपी पतीवर ठेवण्यात आले आहेत. या प्रकरणी उच्च न्यायालयानं आरोपी पतीला जामीन मंजूर केला आहे. मुरादाबादची रहिवासी असलेल्या पत्नीनं आपल्या पतीविरुद्ध ८ सप्टेंबर २०२० रोजी भोजपूर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला होता. पतीनं याविरोधात अलाहाबाद उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. आरोपी पती खुशाबे अली याच्या जामीन याचिकेवर न्यायमूर्ती मो असलम यांनी सुनावणी केली. आरोपी पतीच्या वकिलांच्या म्हणण्यानुसार, मॅजिस्ट्रेटसमोर दिलेल्या जबाबात पीडितेनं अप्राकृतिक संबंध बनवण्याचे आणि पतीच्या भावांकडून बलात्काराच्या आरोपांना नकार दिला होता. यापूर्वी केरळ उच्च न्यायालयानं बलात्कार प्रकरणांत एक महत्त्वपूर्ण निर्णय दिला होता. न्यायालयाच्या म्हणण्यानुसार, पीडितेच्या मांड्यांच्या मध्ये कोणतीही चुकीचं कृत्यं उघड झाल्यास त्यालाही बलात्कारच मानला जाईल. हेदेखील महिलेच्या शरीरासोबत छेडछाड आहे आणि हे कृत्य बलात्कारा प्रमाणेच आहे. बलात्काराच्या आरोपीनं दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणीवेळी केरळ उच्च न्यायालयानं ही टिप्पणी केली होती. या प्रकरणात खालच्या न्यायालयानं आरोपीला बलात्काराचा दोषी ठरवलं होतं. शेजारीच राहणाऱ्या एका अल्पवयीन मुलीच्या अवयवांना चुकीच्या पद्धतीनं स्पर्श करत लैंगिक शोषण केल्याचा आरोप त्याच्यावर करण्यात आला होता.

### WAAREE RENEWABLE TECHNOLOGIES LIMITED

(PREVIOUSLY KNOWN AS SANGAM RENEWABLES LIMITED)
CIN- L93000MH1999PLC120470
Reg Office Address: 504, Western Edge-1, OFF Western Express Highway, Borivali(East), Mumbai - 400066
Tele No. : 022 6644 4444, Email ID : info@waareertl.com, website : www.waareertl.com

**Extract of Unaudited Financial Results for the Quarter Ended on 30/06/2021**

(Amt in Lacs except EPS)

| Sr. No. | Particulars | Standalone | | | | | Consolidated | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Quarter Ended 30-06-2021 (Unaudited) | Quarter Ended 31-03-2021 (Unaudited) | Quarter Ended 30-06-2020 (Audited) | Year ended 31-03-2021 (Audited) | Year ended 31-03-2020 (Audited) | Quarter Ended 30-06-2021 (Unaudited) | Quarter Ended 31-03-2021 (Unaudited) | Quarter Ended 30-06-2020 (Audited) | Year ended 31-03-2021 (Audited) | Year ended 31-03-2020 (Audited) |
| 1. | Total Income from Operations | 2,752.04 | 635.63 | 108.00 | 1,129.54 | 508.07 | 2,852.21 | 897.09 | 146.25 | 1,541.93 | 737.05 |
| 2. | Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items#) | 274.00 | 267.24 | -19.67 | 266.14 | -39.79 | -35.28 | 337.16 | -16.29 | 340.09 | -252.01 |
| 3. | Net Profit / (Loss) for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary items#) | 274.00 | 267.24 | -19.67 | 266.14 | -39.79 | -35.28 | 337.16 | -16.29 | 340.09 | -252.01 |
| 4. | Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items#) | 203.54 | 238.80 | -19.95 | 234.00 | -18.58 | -238.46 | -64.34 | -67.88 | -236.66 | -317.65 |
| 5. | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 203.63 | 238.30 | -19.95 | 235.90 | -18.54 | -238.37 | -63.84 | -67.89 | -234.76 | -317.60 |
| 6. | Equity Share Capital | 2,081.48 | 2,081.48 | 2,081.48 | 2,081.48 | 2,057.88 | 2,081.48 | 2,081.48 | 2,081.48 | 2,081.48 | 2,057.88 |
| 7. | Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet of the previous year | | | | | 1,197.22 | | | | | 146.22 |
| 8. | Earnings Per Share (of Rs. 10 /- each) (for continuing and discontinued operations) - | | | | | | | | | | |
| | 1. Basic: | 0.98 | 1.14 | -0.10 | 1.13 | -0.09 | -1.15 | -0.31 | -0.33 | -1.13 | -1.54 |
| | 2. Diluted: | 0.98 | 1.14 | -0.10 | 1.13 | -0.09 | -1.15 | -0.31 | -0.33 | -1.13 | -1.54 |

Note:
1) The above is an extract of the detailed format of Quarterly/Annual Financial Results filed with the Stock Exchanges under"Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the"Quarterly/Annual Financial Results are available on the websites of the Stock Exchange(s) and the listed entity. (www.bseindia.com)

**For Waaree Renewable Technologies Limited & on behalf of the Board of Directors**
Sd/-
**Hitesh Mehta**
**Director & Chief Financial Officer**
**DIN: 00207506**

**Place: Mumbai**
**Date : August 14, 2021**

### BACIL PHARMA LIMITED

Regd. Office: 71, LAXMI BUILDING, 4TH FLOOR SIR P. M. ROAD, FORT MUMBAI Mumbai City MH 400001 CIN:24200MH1987PLC043427

**Extract of the Standalone Un-audited Financial Results for the Quarter ending on 30/06/2021**

₹ in Lacs

| Sr. No. | Particulars | Quarter ended on 30/06/2021 (Un-audited) | Quarter ended on 31/03/2021 (Audited) | Quarter ended on 30/06/2020 (Un-audited) | Year ended on 31/03/2021 (Audited) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Total income | 0.63 | 1.85 | 1.67 | 7.39 |
| 2 | Net Profit / Loss for the period (before Tax, Exceptional and / or Extraordinary items) | (2.37) | (19.39) | (0.62) | (23.97) |
| 3 | Net Profit / Loss for the period after tax (after Exceptional and / or Extraordinary items | (2.36) | (19.38) | (0.61) | (23.92) |
| 4 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / Loss for the period (After tax ) and Other Compreshensive Income(After tax)] | 3.75 | (21.35) | 10.99 | 0.47 |
| 5 | Equity Share Capital | 589.00 | 589.00 | 589.00 | 589.00 |
| 6 | Earnign Per Shares (of Rs. 10/- each) (for continuing and discontinued operations) - | | | | |
| | 1. Basic: | (0.04) | (0.33) | (0.01) | (0.41) |
| | 2. Diluted: | (0.04) | (0.33) | (0.01) | (0.41) |

Note: The above is an extract of the detailed format of the Un-udited Financial Results for the Quarter ended 30th June, 2021 filed with the Stock Exchange under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full Format of the Financial Results for the Quarter ended 30th June, 2021 are available on the Stock Exchange websites (www.bseindia.com)

**For and on behalf of the Board**
**Sd/-**
**Prakash Shah**
**Director**
**DIN No-01136800**

**Place: Mumbai**
**Date: 14.08.2021**

### SHARAD FIBRES & YARN PROCESSORS LIMITED

**CIN:-LI7110MH1987PLC043970**
319, Prabhadevi Industrial Estate, Off. Veer Savarkar Marg, Prabhadevi Mumbai- 400025

**STANDALONE UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTERLY ENDED 30TH JUNE,2021**

**ANNEXURE - I** (Rs in lakhs)

Statement Of Standalone Unaudited Financial Results For The Quarter Ended 30th June, 2021

| Sr. No. | Particulars | Standalone | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | Quarter Ended On 30.06.2021 (Unaudited) | Quarter Ended On 31.03.2021 (Audited) | Quarter Ended On 30.06.2020 (Unaudited) | Year Ended On 31.03.2021 (Audited) |
| 1 | Total Incomefrom Operations | 16.586 | 1908.5212 | 23.002 | 1984.294 |
| 2 | Net Profit / (Loss) for period ( before tax, exceptional and /or extraordinary items#) | (19.965) | 1,565.967 | (12.020) | 1498.149 |
| 3 | Net Profit / (Loss) for period ( before tax, after exceptional and /or extraordinary items#) | (19.965) | 1,565.967 | (12.020) | 1498.149 |
| 4 | Net Profit / (Loss) for period (after tax, after exceptional and /or extraordinary items#) | (19.965) | 1,565.967 | (12.020) | 1498.149 |
| 5 | Total Comprehensive Income for the period (Comprising Profit /(Loss) for the period (after tax) and (other comprehensive income (after tax) | (19.965) | 1,565.967 | (12.020) | 1498.149 |
| 6 | Equity Sahre Capital | 436.64 | 436.64 | 436.64 | 436.64 |
| 7 | Reserves (excluding Revaluation Reserves) as shown in Audited balance sheet of the Previous Year) | | | | |
| 8 | Earning Per share(of Rs10/- each) (for Continuing and discontinued Operations) | | | | |
| 1 | Basic | -0.46 | 35.86 | -0.28 | 34.31 |
| 2 | Diluted | -0.46 | 35.86 | -0.28 | 34.31 |

**Note:**
a The above is an extract of the detailed format of Standalone Quarterly ended 30th June, 2021 financial results with the stock exchange under regulation33 of the SEBI (Listing and Other DisclosureRequirements) Regulations,2015. The Full Formatof the Quarterly Financial Results are available on the websites of the Stock Exchange(s) and the listed entity(www.sharadfibres.com)
b) The Impact on net Profits /loss, total comprehensive income or any other relevant financial Items due to changes in accounting policies shall be disclosed by means of a footnote

**For SHARAD FIBRES AND YARN PROCESSORS LTD.**
**Sd/-**
**JYOTI NANKANI**
**MANAGING DIRECTOR**

**DATE : 14/08/2021**
**PLACE : MUMBAI**